0 8 DEC 2025

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# रंगीबेरंगी फुलांच्या दुनियेत रमली करवीरनगरी



कोल्हापूर : गार्डन्स क्लब व महापालिकेच्या संयुक्त विद्यमाने महावीर उद्यान येथे भरवण्यात आलेले ५५ वे पुष्प प्रदर्शन.

(सर्व छाया : पांडुरंग पाटील)

## शिवाजी विद्यापीठ सर्वसाधारण विजेता

कोल्हापूर : गार्डन्स क्लब, महापालिका यांच्यातर्फे महावीर उद्यान येथे आयोजित ५५ व्या पुष्प प्रदर्शनात रविवारी काही निवडक पर्यावरणपूरक लघुपटांच्या स्क्रीनिंगने, तसेच सर्व स्पर्धांच्या बक्षीस समारंभाने या प्रदर्शनाची सांगता झाली. सर्वसाधारण विजेतेपद शिवाजी विद्यापीठाने पटकावले. प्रदर्शनानिमित्त भरवण्यात आलेल्या 'प्लास्टिक प्रदूषणाचा अंत' ही संकल्पना घेऊन स्किटची चुरशीची स्पर्धा झाली.

पुष्प प्रदर्शनात रविवारी बोटॅनिकल फॅशन शो डीजे आणि लायटिंगच्या साथीने दणक्यात पार पडला. दरवर्षीप्रमाणे या वर्षीच्या बोटॅनिकल फॅशन शोमध्ये आगळ्यावेगळ्या कल्पनांसह पाने, फुले व फळे आणि पर्यावरणपूरक साहित्य यांचा उपयोग करून तरुणाईने वेशभूषांचा आविष्कार सादर केला. यानंतर विद्यार्थ्यांच्या चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. यावेळी ज्येष्ठ चित्रकार विलास बकरे यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षपद भूषविले. चित्रकला स्पर्धेतील विजेत्यांची चित्रे २०२७ च्या कॅलेंडरसाठी निवडली आहेत. यावेळी लघुपट, स्कीट, फॅशन शो, स्पॉट गार्डन डिझाईन यांचे मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. कोषाध्यक्ष प्राजक्ता चरणे यांनी आभार प्रदर्शन केले. संध्याकाळच्या सत्रात पृथ्वी आणि पर्यावरण या संकल्पनेवर आधारित लघुपट स्पर्धेतील निवडक व विजेते लघुपट पडद्यावर दाखवण्यात आले. विजेत्या स्पर्धकांना रोटरी गार्गीच्या अध्यक्षा अंजली मोहिते आणि उद्योजक सचिन शिरगावकर या मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले.

यावेळी क्लबच्या अध्यक्षा पल्लवी कुलकर्णी, सचिव सुप्रिया भस्मे, कोषाध्यक्ष प्राजक्ता चरणे, शांतादेवी डी. पाटील, शशिकांत कदम, रवींद्र साळुंखे, अनिता ढवळे, संगीता कोकितकर, सुभाषचंद्र अथणे, रोहिणी पाटील, रेणू वाधवाणी, सिद्धी गानबोटे, वर्षा वायचळ, दीपा भिंगार्डे, सुषमा शेवडे, रूपेश हिरेमठ, अंजली साळवी, निशिगंधा कुलकर्णी, रचना संपत कुमार, अनघा साळोखे यांनी विशेष परिश्रम घेतले.

- **स्कीट स्पर्धेचे विजेते अनुक्रमे :** सेवंथ डे हायर सेकंडरी स्कूल, रोटा किडस्, बडस् इंटरनॅशनल स्कूल.
- **बोटॅनिकल फॅशन शोचे विजेते :** एनआयएफ ग्लोबल, कोल्हापूर, एसपीएसएमबीएचएस आर्किटेक्ट, डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्ट.
- **स्पॉट गार्डन निकाल :** कॉलेज ऑफ आर्किटेक्चर कोल्हापूर, डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, कला प्रबोधिनी इन्स्टिट्यूट ऑफ डिझाईन.
- **लघुपट विजेते :** अबनायझेशन- रोहित चौगुले, द फोल्डिंग गेम- सानिका शिंदे, वायनाड अन्नोरिकल- शाबू. ए. स. उत्तेजनार्थ नॅनो कॅप्सूल्स- डॉ. प्रदीप कुमार.

0 8 DEC 2025

सकाळ

# शिवाजी विद्यापीठ सर्वसाधारण विजेते

## विविध स्पर्धा : गार्डन्स क्लबच्या पुष्प प्रदर्शनाची सांगता

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ७ : आबालवृद्धांच्या रंगलेल्या चित्रकला स्पर्धा, 'प्लास्टिक प्रदूषणाचा अंत' या विषयावर रंगलेले प्रहसन, फुले, पाने व फळांचा उपयोग करून साकारलेल्या वेशभूषा व त्यांचा बोटॅनिकल फॅशन शो अशा वातावरणात गार्डन्स क्लब व महापालिका आयोजित पुष्पप्रदर्शनाची सांगता झाली. प्रदर्शनाच्या निमित्ताने झालेल्या विविध स्पर्धांचे सर्वसाधारण विजेतेपद शिवाजी विद्यापीठास मिळाले.

सकाळच्या सत्रात लहान थोरांच्या चित्रकला स्पर्धा झाल्या. स्पर्धेचे बक्षीस वितरण एचपी हॉस्पिटॅलिटी इंडस्ट्रीजचे हिराकांत पाटील व ज्येष्ठ चित्रकार विलास बकरे यांच्याहस्ते झाले. चित्रकला स्पर्धेतील विजेत्यांची चित्रे २०२७ च्या कॅलेंडरसाठी निवडली आहेत.

संध्याकाळच्या सत्रात पृथ्वी आणि पर्यावरण या संकल्पनेवर आधारित लघुपट स्पर्धेतील निवडक व विजेते लघुपट पडद्यावर दाखवण्यात आले. विजेत्या स्पर्धकांना रोटरी गार्गीच्या अध्यक्षा अंजली मोहिते आणि उद्योजक सचिन शिरगावकर यांच्या हस्ते पारितोषिक वितरण केले.

प्रदर्शनामध्ये क्लब आणि इंडियन वुमन सायंटिस्ट असोसिएशन कोल्हापूर यांच्यातर्फे फ्लॉवर फेस्टिव्हल या संकल्पनेअंतर्गत प्रात्यक्षिके सादर झाली. मार्गदर्शक म्हणून बॉम्बे ओहारा चाप्टरच्या तज्ज्ञ मार्गदर्शकांच्या टीमने शास्त्रोक्त पद्धतीने अत्तरे तयार करणे, फुलांपासून सरबते तयार करणे, तसेच कागदी फुले तयार करणे यासाठी मार्गदर्शन केले. युनायटेड नेशन एन्व्हायर्नमेंट प्रोग्रामची यावर्षीची संकल्पना प्लास्टिक प्रदूषणाचा अंत यावर आधारित रचना, सजावट तसेच प्रात्यक्षिके यांचा सुंदर मिलाफ यावर्षी प्रदर्शनात अनुभवायला मिळाला.

या दोन दिवसीय प्रदर्शनाकरिता गार्डन्स क्लबच्या अध्यक्षा पल्लवी कुलकर्णी, सचिव सुप्रिया भस्मे, कोषाध्यक्ष प्राजक्ता चरणे, शांतादेवी डी. पाटील, शशिकांत कदम, रवींद्र साळुंखे, अनिता ढवळे, संगीता कोकितकर, सुभाषचंद्र अथणे, रोहिणी पाटील, रेणू वाधवाणी, सिद्धी गानबोटे, वर्षा वायचळ, दीपा भिंगार्डे, सुषमा शेवडे, रुपेश हिरेमठ, अंजली साळवी, निशिगंधा कुलकर्णी, डॉ. रचना संपतकुमार, अनघा साळोखे यांनी परिश्रम घेतले. कोषाध्यक्ष प्राजक्ता चरणे यांनी आभार मानले.

## विविध स्पर्धेतील विजेते असे :

### स्कीट

- प्रथम : सेवंथ डे हायर सेकंडरी स्कूल
- व्दितीय : रोटा किड्स
- तृतीय : बडस इंटरनॅशनल स्कूल

### बोटॅनिकल फॅशन शो

- प्रथम : एन आय एफ ग्लोबल
- व्दितीय : एसपीएसएमबीएचएस आर्किटेक्ट
- तृतीय : डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्ट

### स्पॉट गार्डन

- प्रथम : कॉलेज ऑफ आर्किटेक्चर कोल्हापूर
- व्दितीय : डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर
- तृतीय : कला प्रबोधिनी इन्स्टिट्यूट ऑफ डिझाईन

### लघुपट

- प्रथम : अर्बनायझेशन - रोहित चौगले
- व्दितीय : द फीडिंग गेम - सानिका शिंदे
- तृतीय : वायनाड अन्नोरिकल - शाबू. ए. स
- उत्तेजनार्थ : नॅनो कॅप्सुल्स - डॉ. प्रदीप कुमार

0 8 DEC 2025

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाला पुष्प प्रदर्शनाचे विजेतेपद

## पर्यावरणपूरक लघुपट, बक्षीस समारंभाने सांगता

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** गार्डन्स क्लब आणि महानगरपालिका यांच्यातर्फे आयोजित केलेल्या ५५ व्या पुष्प प्रदर्शनाची सांगता रविवारी काही निवडक पर्यावरणपूरक लघुपटांच्या सादरीकरणाने झाली. यावेळी स्पर्धेतील विजेत्या मान्यवरांच्या हस्ते बक्षीस देण्यात आले. शिवाजी विद्यापीठाने सर्वसाधारण विजेतेपदावर आपली मोहोर उमटवली.

प्रदर्शनानिमित्त भरविलेल्या लघुपट, स्कीट, फॅशन शो, स्पॉट गार्डन डिझाईन तसेच परीक्षकांचा रोटरी गार्गीच्या अध्यक्षा अंजली मोहिते, उद्योजक सचिन शिरगावकर या मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून एचपी हॉस्पिटॅलिटी इंडस्ट्रीजचे हिराकांत पाटील उपस्थित होते. ज्येष्ठ चित्रकार विलास बकरे अध्यक्षस्थानी होते. कोषाध्यक्ष प्राजक्ता चरणे यांनी आभार मानले. विजेत्यांची चित्रे २०२७ च्या कॅलेंडरसाठी निवडली आहेत.



गार्डन क्लब आणि इंडियन वुमन सायंटिस्ट असोसिएशनतर्फे रविवारी "फ्लॉवर फेस्टिव्हल" संकल्पनेवर सृजनशील प्रात्यक्षिकांचे सादरीकरण केले.

"प्लास्टिक प्रदूषणाचा अंत" या संकल्पनेवरील स्कीटला चांगला प्रतिसाद मिळाला. यात सेवंथ डे हायर सेकंडरी स्कूलने प्रथम, रोटा किड्सने द्वितीय आणि बडस इंटरनॅशनल स्कूलने तृतीय क्रमांक मिळवला.

या स्पर्धेत एनआयएफ ग्लोबलने प्रथम, एसपीएसएमबीएचएस आर्किटेक्टने द्वितीय, डी. वाय.पी कॉलेज ऑफ आर्किटेक्टने तृतीय क्रमांक मिळवला. स्पॉट गार्डन स्पर्धेत कॉलेज ऑफ आर्किटेक्चर कोल्हापूरने प्रथम, डी. वाय. पाटील कॉलेज द्वितीय आणि कला प्रबोधिनी इन्स्टिट्यूट ऑफ डिझाईनने तृतीय क्रमांक मिळविला.

0 8 DEC 2025

जनप्रवास

# विद्यापीठात दिव्यांगांसाठी करिअर गाईडन्स

## सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी नृत्य, गायन केले सादर

**जनप्रवास : कोल्हापूर**

आंतरराष्ट्रीय दिव्यांग दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठातील युजीसी स्किम फॉर पर्सन्स विथ डिसॅबिलीटीज आणि समावेशी शिक्षण संसाधन केंद्र यांच्यातर्फे विद्यापीठासह संलग्नित महाविद्यालयातील दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी करियर गाईडन्स आणि सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. शिवाजी विद्यापीठाच्या प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम झाला.



शिवाजी विद्यापीठातील आयोजित कार्यक्रमात नृत्य सादर करताना विद्यार्थी.

प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव म्हणाल्या, दिव्यांग विद्यार्थ्यांना विविध सोयी पुरविण्यात आणि त्यांचा मुख्य प्रवाहामध्ये समावेश करण्याच्या कामी शिवाजी विद्यापीठ अग्रेसर आहे. येथून पुढेही दिव्यांग कल्याणासाठी विद्यापीठ कार्यरत राहील. इंग्रजी अधिविभागाचे डॉ. मनोहर वासवानी यांनी दृष्टीदिव्यांगासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर प्रभावीपणे कसा करावयाचा. आधुनिक तंत्रज्ञान आपल्या प्रगतीसाठी कसे वापरावे, याविषयी मार्गदर्शन केले. म्युझिक कौन्सिलिंगमध्येही दृष्टीदिव्यांग विद्यार्थ्यांना मोठी करिअर संधी असल्याचेही त्यांनी सांगितले. बालाजी शिंदे यांनी बँकिंग, कॉर्पोरेट तथा अशासकीय संस्थांमध्ये दिव्यांगांसाठी असणाऱ्या संधींविषयी माहिती दिली. यानंतर झालेल्या सांस्कृतिक कार्यक्रमात हेल्पर्स ऑफ दि हॅन्डीकॅप्ड, मिरजकर तिकटी अंधशाळा, कर्णबधीर विद्यालय, कागल येथील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी नृत्य व गायन सादरीकरण केले. केंद्राच्या समन्वयक डॉ. प्रतिभा देसाई यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे संयोजन केले.

08 DEC 2025

जनप्रवास

# शिवाजी विद्यापीठात मंगळवारी राष्ट्रीय चर्चासत्र

**कोल्हापूर :** महाराणी ताराबाईंच्या ३५० व्या जयंतीचे औचित्य साधून शिवाजी विद्यापीठात "महाराणी ताराबाई आणि अठरावे शतकः एक ऐतिहासिक दृष्टिक्षेप" या विषयावर मंगळवार(दि. ९) दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र होणार आहे. पहिले सत्र सकाळी ११:३० वाजता ज्येष्ठ इतिहासकार डॉ. जयसिंगराव पवार मार्गदर्शन करणार आहेत. अध्यक्षस्थानी डॉ. महादेव देशमुख असतील. दुसऱ्या सत्रात महाराणी ताराबाईंचे चरित्रकार डॉ. जयसिंगराव पवार यांची विशेष मुलाखत डॉ. नंदकुमार मोरे घेतील. अमेरिकेच्या अरिझोना विद्यापीठातील ज्येष्ठ अमेरिकन इतिहासकार डॉ. रिचर्ड ईटन ऑनलाईन प्रणालीद्वारे दख्खनमधील महाराणी ताराबाईंचे कार्य या विषयावर मार्गदर्शन करतील. बुधवारी सायंकाळी ५ वाजता ज्येष्ठ विचारवंत डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या प्रमुख उपस्थितीत चर्चासत्राचा समारोप होईल. या सत्राच्या अध्यक्षस्थानी डॉ. जयसिंगराव पवार असतील. याखेरीजही दोन्ही दिवशी विविध सत्रे होणार आहेत, असे आवाहन विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, इतिहास विभागप्रमुख डॉ. अवनीश पाटील आणि छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्राच्या संचालक डॉ. निलांबरी जगताप यांनी केले आहे.

0 8 DEC 2025

पुण्यनगरी

# विद्यापीठात उद्यापासून दोन दिवसीय चर्चासत्र

कोल्हापूर : महाराणी ताराबाईंच्या ३५० व्या जयंतीचे औचित्य साधून शिवाजी विद्यापीठात 'महाराणी ताराबाई आणि अठरावे शतक : एक ऐतिहासिक दृष्टिक्षेप' या विषयावर मंगळवार, दि. ९ रोजीपासून दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यापीठाचा इतिहास अधिविभाग, शाहू संशोधन केंद्र, छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्र आणि छत्रपती संभाजी महाराज संशोधन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने चर्चासत्र होत आहे. चर्चासत्राचे पहिले सत्र मंगळवारी सकाळी ११.३० वाजता सुरू होईल. ज्येष्ठ इतिहासकार डॉ. जयसिंगराव पवार चर्चासत्राचे सूत्रभाष्य करतील. अध्यक्षस्थानी मानव्यविद्या शाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख असतील. दुसऱ्या सत्रात महाराणी ताराबाईंचे चरित्रकार डॉ. जयसिंगराव पवार यांची विशेष मुलाखत डॉ. नंदकुमार मोरे घेतील. ज्येष्ठ अमेरिकन इतिहासकार डॉ. रिचर्ड ईटन ऑनलाईन प्रणालीद्वारे सहभागी होऊन 'दख्खनमधील महाराणी ताराबाईंचे कार्य' या विषयावर मते मांडतील. बुधवार, दि. १० रोजी सायंकाळी ५ वाजता ज्येष्ठ विचारवंत डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या प्रमुख उपस्थितीत चर्चासत्राचा समारोप होईल. या सत्राच्या अध्यक्षस्थानी डॉ. जयसिंगराव पवार असतील.

0 8 DEC 2025

पुढारी

# एमबीए प्रवेशाची सीमॅट परीक्षा २५ जानेवारीला

## एनटीएकडून सीमॅट परीक्षेची तारीख जाहीर

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

नॅशनल टेस्टिंग एजन्सीची (एनटीए) कॉमन मॅनेजमेंट ॲडमिशन टेस्ट अर्थात सीमॅट परीक्षा येत्या २५ जानेवारीला घेण्यात येणार असल्याचे एनटीएच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे.

सीमॅट २०२६ साठी १७ ऑक्टोबरपासून नोंदणी प्रक्रिया सुरू करण्यात आली होती. नोंदणी करण्यासाठी १७ नोव्हेंबरपर्यंत संधी देण्यात आली होती. एआयसीटीईच्या माध्यमातून व्यवस्थापन शाखेच्या पदव्युत्तर पदव्यांसाठी म्हणजेच एमबीए अभ्यासक्रमांसाठी ही परीक्षा घेतली जाते. या परीक्षेनंतर विद्यार्थी भारतातील सर्वोत्तम व्यवस्थापन महाविद्यालयांत प्रवेश घेऊ शकतात. संबंधित परीक्षा ऑनलाइन पध्दतीने इंग्रजी माध्यमातून घेण्यात येणार आहे. परिमाणात्मक तंत्रे, तार्किक तर्क, भाषा आकलन, सामान्य जागरूकता आणि नवोन्मेष आणि उद्योजकता आदी विषयांवर संबंधित परीक्षेत प्रश्न विचारले जाणार आहेत.

0 8 DEC 2025

सकाळ

# दिव्यांगांना मिळाली 'करिअर'ची दिशा

## विद्यापीठातील समावेशी शिक्षण केंद्रातर्फे मार्गदर्शन

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ७ : आंतरराष्ट्रीय दिव्यांग दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठातील युजीसी स्किम फॉर पर्सन्स विथ डिसॲबिलीटीज आणि समावेशी शिक्षण संसाधन केंद्रातर्फे विद्यापीठासह संलग्नित महाविद्यालयातील दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी करिअर गाईडन्स आणि सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आला. प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव प्रमुख उपस्थित होत्या.

'दिव्यांग विद्यार्थ्यांना विविध सोयी पुरविण्यात आणि त्यांचा मुख्य प्रवाहामध्ये समावेश करण्याच्या कामी शिवाजी विद्यापीठ अग्रेसर आहे. यापुढेही दिव्यांग कल्याणासाठी विद्यापीठ कार्यरत राहील', असे प्र-कुलगुरू डॉ. जाधव यांनी सांगितले.

इंग्रजी अधिविभागाचे डॉ. मनोहर वासवानी यांनी दृष्टी दिव्यांगांसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर प्रभावीपणे कसा करावयाचा आणि आधुनिक तंत्रज्ञान आपल्या प्रगतीसाठी कसे वापरावे, याविषयी मार्गदर्शन केले. म्युझिक कौन्सिलिंगमध्येही दृष्टी दिव्यांग विद्यार्थ्यांना मोठी करिअर संधी असल्याचेही त्यांनी सांगितले. बालाजी शिंदे यांनी बँकिंग, कॉर्पोरेट तथा अशासकीय संस्थांमध्ये दिव्यांगांसाठी असणाऱ्या संधींविषयी माहिती दिली. सांस्कृतिक कार्यक्रमात हेल्पर्स ऑफ दि हॅन्डीकॅप्ड, मिरजकर तिकटी अंधशाळा, कर्णबधीर विद्यालय आणि कागल येथील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी नृत्य, गायन सादरीकरण केले. केंद्राच्या समन्वयक डॉ. प्रतिभा देसाई यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले.